(237)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/ ७७९ /२०२४
दिनांक :११ /०३ /२०२४.

**"जाहीर नोटीस"**
**(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि,

२) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि,

३) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियोजन आहे. आणि,

४) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महाराष्ट्र शासन राज्यपत्र ११ एप्रिल १९९१, भाग १ पुरवणी मध्ये २१७८६.४९ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता घोषित आहे. आणि,

५) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे मालमत्ता पत्रकानुसार एकूण क्षेत्र १६६०६.३० असून, त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार १७५४०.३० चौ.मी. इतके आहे. त्यामुळे सदर योजनेकरीता उपरोक्त मिळकतीची मोजणी अंती मिळणा-या क्षेत्रापुर्वी वरीलपैकी कमीत कमी **१६६०६.३०** चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे.आणि,

**६) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे. आणि,**

७) ज्याअर्थी, अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भातील आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पूर्वसूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत सदर क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय गुणवत्तेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

**अनुसूची**

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.६५३ पै, सि.स.नं.२९४२, २९४३, २९९६ ते २९९९, गवळीमाथा नगर, भोसरी, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| ठिकाण- भोसरी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (प्रस्ताव सादर केलेनुसार झोपडपट्टी खालील क्षेत्र) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार) | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.६५३पै, सि.स.नं. २९४२, २९४३, २९९६ ते २९९९ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १६६०६.३० चौ.मी. | सि.स.नं. २९९५ | सि.स.नं. २९३७ पै | सि.स.नं. २९४१ पै | जुना-मुंबई-पुणे रस्ता व सि.स.नं.३०००पै |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ११ /०३ /२०२४.

9.3.2024

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
४. विकसक मे. हिरुंभ इन्फ्रा एल.एल.पी - यांना पुढील कार्यवाहीस्तव.